# सचोटी



आशीष रायचूर

## विनामूल्य वाटपासाठी

ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

## संपर्क सूचना

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

## आर्थिक भागिदारी

या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

## मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च  ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Integrity)

# सचोटी

# अनुक्रमणिका

परिचय

1. सचोटीवर शिकवण 1
2. परमेश्वर आमची पडताळणी करतो आणि आमचा सात्विकपणा जाणतो (किंवा त्याची उणीव!) 6
3. आम्ही आमच्या सचोटीबाबत अद्याप तडजोड का करतो? 9
4. अप्रामाणिकपणाचे परिणाम 13
5. प्रामाणिकपणाचे आशीर्वाद 17
6. प्रतिसाद—सुटका, पश्चाताप, परित्याग आणि समर्पण 20

# परिचय

आम्ही या जगात पाहात असलेल्या भ्रष्टाचाराविषयी सांगण्यासारख्या अनेक गोष्टी आम्हां सर्वांजवळ आहेत, विशेषेकरून जेव्हा आम्ही सरकारी कार्यालयास आणि इतर ठिकाणांस भेट देतो, तेव्हा आम्हाला सर्वत्र भ्रष्टाचार अप्रामाणिकता आणि लाचखोरी जवळपास सगळीकडेच आढळते. हे सर्वसामान्य असल्याचे दिसून येते. जोवर असे करण्याचे कारण आहे तोवर अप्रामाणिकपणा, लुबाडणूक आणि खोटेपणा मान्य असल्यासारखे दिसते.

तथापि जेव्हा आम्ही परमेश्वराच्या लोकांमध्ये अप्रामाणिकपणा, अनीति आणि सचोटीची उणीव पाहतो तेव्हा खरोखरच दुःख वाटते, कारण आम्ही असे वागावयास नको. आम्ही सचोटीने, प्रामाणिकपणे, आणि धार्मिकतेने कसे वागावे, हे आम्हास माहीत असले पाहिजे कारण आपण देवाचे वचन आणि त्याची या गोष्टींबद्दलची शिकवण याविषयी वाचतो. याहीपेक्षा वाईट म्हणजे जेव्हा आम्ही अनीति, अप्रामाणिकपणा आणि सचोटीचा अभाव पाळकांमध्ये, उपदेशकांमध्ये, शिक्षकांमध्ये आणि देवाच्या वचनाच्या सेवकांमध्ये पाहतो. मला खात्री आहे की आमच्यापैकी अनेक जण “ख्रिस्ती” लाचखोरी, खोटे बोलणे, अप्रामाणिकपणा इत्यादी गोष्टी सांगू शकतील!

जेव्हा आम्ही ऑल पीपल्स मंडळी आणि बंगलोरमध्ये पाळकीय सेवा सुरू केली तेव्हा प्रत्येक ख्रिस्ती खरे बोलेल अशी आमची मानसिकता होती. आम्ही कदाचित असा विचार केला आहे कारण आम्ही पूर्वी ज्या लहान समुदायांमध्ये काम केले होते आणि त्यांच्याशी संवाद साधला होता, ते बहुतेक लोक सत्य बोलत होते आणि आम्ही फक्त लोकांवर पूर्णतः विश्वास ठेवला होता. म्हणून, आम्ही ती

कल्पना आमच्याबरोबर ठेवली. तथापि, ख्रिस्ती लोक खोटे बोलत असल्याचे पाहून आम्हाला धक्का बसला! आमची तात्काळ प्रतिक्रिया अविश्वासाची होती—"ख्रिस्ती लोकांनी खोटे बोलणे, अनीतिने वागणे आणि सचोटीच्या अभावाने वागणे योग्य नाही!"

आमची भेट अशा पाळकांशी आणि परमेश्वराच्या अशा सेवकांशी झाली जे अप्रामाणिक होते. "चांगले" अहवाल ऐकण्याच्या आणि त्यांच्या "कामाची" छायाचित्रे पाहण्याच्या अशा अनेक घटना मी सांगू शकतो. त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मी हजारो रुपयांचे धनादेश लिहून दिलेले आहेत. त्यानंतर आम्हाला कळून आले की आम्ही लोकांच्या शब्दांवर इतक्या लवकर विश्वास करता कामा नये. मग असे झाले की जोवर आम्हाला खरोखरच खात्री पटेना तोवर आम्ही लोकांवर विश्वास करणे सोडले. आम्हाला आमची विचारसरणी बदलावी लागली. आम्ही अशा परिस्थितीत आलो जेथे आम्हाला लोकांवर पूर्णपणे विश्वास करण्यापूर्वी त्यांचे मूल्यमापन करणे आवश्यक होते.

हे लिखाण लिहिण्याचे उद्दिष्ट्य परमेश्वराच्या लोकांमध्ये खालील गुणांस उत्तेजन देणे आहे

- सचोटीप्रत वचनबद्धता
- प्रामाणिकपणाप्रत वचनबद्धता
- आपल्या बोलण्यात, आपण ज्या प्रकारे आपला व्यवसाय, कारकीर्द आणि इतर सर्व गोष्टी चालवतो त्यामध्ये सरळपणा आणि धार्मिकतेची वचनबद्धता असावी. आपला दृष्टिकोन असा असावा की, "आम्हाला कितीही किंमत मोजावी लागली तरीसुद्धा आपण धार्मिकतेसाठी वचनबद्ध राहू."
- सचोटीने चालण्याच्या आशीर्वादाची जाणीव. जेव्हा आम्ही खोटे बोलण्याचा पर्याय निवडतो तेव्हा परमेश्वर आणि आमच्यासाठी

ठेवलेल्या आशीर्वादांस आम्ही मुकतो हे आम्हांस कळत नाही.

- प्रभूप्रत समर्पण आणि आम्हास रोखून धरणारी बंधने तोडून टाकण्यास त्याला मुभा देणे, यासाठी की या बाबतीत आमच्यात बदल घडून यावा. आमच्यापैकी काही लोकांस असे दिसून येईल की आम्ही बंधनात आहोत आणि आमची इच्छा असली तरीही आम्ही सत्य बोलू शकत नाही. तसे असल्यास शक्यता ही आहे की आम्हाला खोटेपणाच्या आणि फसवणुकीच्या आत्म्यापासून मुक्त होण्याची गरज आहे ज्याविषयी पवित्र शास्त्र सांगते

परमेश्वर तुम्हाला आशीर्वादित करो!

आशीष रायचूर

# 1
# सचोटीवर शिकवण

पवित्र शास्त्र आपल्याला सचोटीने, सरळपणाने आणि प्रामाणिकपणाने वागण्यास शिकवते.

**नीतिसूत्रे 6:16-19**
**16 परमेश्वर ज्यांचा द्वेष करतो अशा सहा गोष्टी आहेत; नव्हे, त्याला अशा सात गोष्टींचा वीट आहे:**
**17 उन्मत्त दृष्टी, लबाड बोलणारी जिव्हा, निर्दोष रक्त पाडणारे हात,**
**18 दुष्ट योजना करणारे अंतः करण, दुष्कर्म करण्यास त्वरेने धावणारे पाय,**
**19 लबाड बोलणारा खोटा साक्षी, व भावाभावांत वैमनस्य उत्पन्न करणारा मनुष्य, ह्या त्या होत.**

नीतिसूत्रे 6:16-19 या वचनात अशा गोष्टींची यादी दिलेली आहे ज्यांचा परमेश्वराला तिटकारा आहे. यात खोटे बोलणे, वाईट योजना आखणे, वाईट करणे, खोटी साक्ष देणे आणि मतभेद पेरणे यांचा समावेश आहे. उदाहरणार्थ, जर एखाद्या कंपनीतील अकाउंटंटने तथ्ये न दर्शविणारा अहवाल तयार करण्यासाठी आकड्यांची फेरफार केली, तर ती दुष्ट योजना आहे. जर आपण असे म्हणतो की आपण असे काही पाहिले आहे जेव्हा आपण प्रत्यक्षात कधीच पाहिले नाही, तर ते खोटी साक्ष देणे आहे, आणि परमेश्वराच्या दृष्टीने हे तिरस्करणीय आहे.

**नीतिसूत्रे 12:22**
**असत्य वाणी परमेश्वराला वीट आणते, परंतु सत्याने वागणारे त्यास आनंद देतात.**

परमेश्वर "असत्य वाणी" खोटे बोलणाऱ्या जिव्हेकडे केवळ चरित्र

दोष म्हणून दुर्लक्ष करणार नाही आणि क्षमा करणार नाही. परमेश्वराला त्याचा वीट येतो. ही गोष्ट हे प्रगट करते की तो ते मुळीच सहन करीत नाही. दुसरीकडे, जे सत्यतेने वागतात त्यांच्यामुळे तो प्रसन्न होतो. जर आम्ही आमच्या नोकरीत, आमच्या पैशांच्या बाबतीत आणि आमच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रामाणिक राहण्याप्रत वचनबद्ध असलो तर पवित्र शास्त्र म्हणते की आम्ही त्याच्या प्रसन्नतेचे कारण आहोत. जेव्हा आपण सत्याने वागतो तेव्हा परमेश्वर प्रसन्न होतो. समजा, आमचा अधिकारी आम्हास असे काम करावयास सांगतो जे खरे नसेल, तर हे ठरविणे आमच्या हाती आहे की आम्ही आमच्या परमेश्वरास प्रसन्न करणार आहोत की आमच्या अधिकाऱ्यास. निवड पूर्णपणे आपली आहे. सचोटीसाठी आम्ही पूर्णपणे वचनबद्ध असणे **आवश्यक** आहे.

**निर्गम 23:6-8**

**6 तुझ्या लोकांपैकी जो कंगाल असेल त्याच्या मुकदम्याचा निवाडा विपरीत करू नकोस.**

**7 खोट्या मुकदम्यापासून दूर राहा; निरपराधी व नीतिमान ह्यांचा वध करू नकोस, कारण दुष्टाला मी नीतिमान ठरवणार नाही.**

**8 लाच घेऊ नकोस, कारण लाच डोळसांना आंधळे करते, आणि नीतिमानांच्या म्हणण्याचा विपर्यास करते.**

हे मजेदार आहे की आम्ही कधीकधी असा विचार करतो की आम्ही खोटेपणाचा आधार घेऊन सत्याचा बचाव केला पाहिजे. हे अनावश्यक आहे कारण सत्य स्वतःस सिद्ध करील आणि आम्हाला आमच्या खोटेपणाचा आधार घेऊन बचाव करण्याची गरज नाही. कामाच्या ठिकाणी या परिस्थितीचा विचार करा जी बरेचदा घडून येते—एक सहकारी तुम्हाला फोन करतो की तुम्ही बॉसला हे कळवावे की त्याला बरे नाही, त्याला बरे आहे पण दुसऱ्या कामानिमित्ताने तो दिवसाची सुट्टी घेण्याचा विचार करत आहे. आपण असे करण्यास सहमत होता आणि अधिकाऱ्याशी खोटे बोलता. आपणास असे वाटत असेल की आपल्या मित्राची मदत करण्याद्वारे आपण काहीतरी चांगले

करीत आहात, पण आपण खोटे बोलत आहात कारण आपणास माहीत आहे की आपला मित्र आजारी नाही पण त्याच्या खाजगी कामाने बाहेर गेलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे की आपण त्याच्यासोबत त्याच्या खोटेपणात सहभागी झाला आहात. निर्गम 23:7 आम्हास सांगते की आम्ही खोट्या  गोष्टीपासून दूर राहावे. अशा गोष्टींमध्ये अडकू नका. आपल्या सहकाऱ्याला हे सांगण्याचे धाडस करा की त्याने अधिकाऱ्यांशी सत्य बोलावे. आम्ही कधीकधी अशा गोष्टींत सहभागी होतो कारण आपणास वाटते की आम्ही आपल्या मित्रांवर कृपा करीत आहोत. नाही, आम्ही कृपा करीत नाही!

**स्तोत्रसंहिता 34:13**
**तू आपली जीभ दुर्भाषणापासून व आपले ओठ कपटी भाषणापासून आवर.**

आम्हास आपल्या जिभेवर नियंत्रण राखण्यास सांगण्यात आले आहे (स्तोत्रसंहिता 34:13). लक्षात ठेवा की आमच्या जिभा आमच्या नियंत्रणाखाली आहेत आणि सैतानाच्या नियंत्रणाखाली नाहीत. काही लोक असे म्हणून सबब सांगतात की "सैतानाने मला खोटे बोलण्यास भाग पाडले." सत्य हे आहे की ते स्वतः खोटे बोलले. आता काही लोक असू शकतात जे बंधनात आहेत, जेथे सैतान त्यांना अशाप्रकारे प्रभावित करीत आहे की ते अनियंत्रितपणे खोटे बोलतात, पण हे बंधन येशूच्या नावात तोडता येते. तथापि शेवटी, आपली जीभ आपल्या नियंत्रणात असते. आपल्या खोटे बोलण्याच्या सवयीसाठी आपण सैतान, आपले पालक, आपले नातेवाईक किंवा आपण ज्या वातावरणात लहानाचे मोठे झालो आहोत त्याला दोष देऊ नये. आपण फक्त आपल्या जिभेवर ताबा ठेवायला शिकले पाहिजे.

खोटे बोलतांना आपण आणखी एक सबब ही देतो ते म्हणजे, "देव माझे हृदय जाणतो. मी जरी थोडेसे खोटे बोललो असलो तरी मी फार प्रामाणिक आहे." आणि याचा लोकांवर कसा परिणाम होतो याची आम्हाला चिंता नाही. पण नवा करार आपल्याला शिकवतो की

आपण केवळ देवाच्या दृष्टीनेच नव्हे तर माणसांच्या दृष्टीनेही प्रामाणिक असायला हवे. आमच्यासाठी असे म्हणणे पुरेसे नाही की, "परमेश्वर मला पाहतो आणि माझे अंतःकरण जाणतो." पवित्रशास्त्र हे देखील म्हणते की आम्ही मनुष्यांसमोर प्रामाणिक असले पाहिजे. *"वाइटाबद्दल वाईट अशी कोणाची फेड करू नका. सर्व माणसांच्या दृष्टीने जे सात्त्विक ते करण्याकडे लक्ष ठेवा"* (रोमकरांस पत्र 12:17). उदाहरणार्थ, जर एखाद्या व्यक्तीला खूप गरज असेल, तर तो दुसऱ्याकडून चोरी करू शकत नाही आणि "देव मला आणि माझी परिस्थिती जाणतो" हे सबब वापरू शकत नाही. मी सहसा हे केले नसते, पण मी हे अशासाठी केले कारण मला मोठी गरज होती. गरज मोठी आहे म्हणून देव आणि मनुष्यही चोरीला माफ करणार नाही!

**2 करिंथ 8:21**

**कारण आम्ही 'प्रभूच्या दृष्टीने जे मान्य', इतकेच नव्हे तर 'मनुष्यांच्याही' दृष्टीने जे मान्य, ते करण्याची खबरदारी घेतो.**

पौल समजावितो की तो कशाप्रकारे त्याला देण्यात आलेली देणगी गोळा करीत फिरला आणि त्याने कशाप्रकारे मंडळीद्वारे त्याला देण्यात आलेल्या पैशाचा उपयोग केला. त्याच्या चालचलणुकीत सात्विकपणा होता. त्याने परमेश्वराप्रत आणि त्याला तो पैसा सोपविणाऱ्या लोकांप्रत जबाबदारीच्या भावनेने हाताळला. पौलाची अशी इच्छा होती की आपल्या सर्व व्यवहारात त्याने केवळ परमेश्वरासमोरच नव्हे तर मनुष्यांसमोरही प्रामाणिक असावे.

म्हणूनच ऑल पीपल्स चर्च येथे आम्ही आपली सारी हिशोबाची पुस्तके सुव्यवस्थित राखण्याचा प्रयत्न करतो. आम्ही हा देखील आग्रह करतो की सर्व बिल आणि पैशांचे व्यवहार याचा सर्व तपशील राखला जावा यासाठी की जर कोणी आम्हास प्रश्न विचारला तर आमच्याजवळ सर्व नोंदी सुव्यवस्थित असतील. आम्हास अतिरिक्त प्रयत्न करावा लागण्याची गरज आहे यासाठी की आम्हास परमेश्वरास आणि मनुष्यांस

हिशोब देता यावा.

**इफिसकरांस पत्र 4:25**
**म्हणून लबाडी सोडून देऊन तुम्ही प्रत्येक जण आपापल्या शेजाऱ्याबरोबर खरे बोला, कारण आपण एकमेकांचे अवयव आहोत.**

चर्चमध्ये एकमेकांना “परमेश्वराची स्तुती!” असो असे म्हणणे आणि एकमेकांशी खोटे बोलणे सुरू ठेवणे किती विचित्रपणाचे आहे. पवित्र शास्त्र आम्हास खोटेपणाचा त्याग करण्यास आणि एकमेकांशी सत्य बोलण्यास सांगते. आम्ही सर्व ख्रिस्ताच्या देहाचे अवयव आहोत आणि आम्ही एकमेकांशी सत्य बोलले पाहिजे.

**1 पेत्र 2:12**
**परराष्ट्रीयांत आपले आचरण चांगले ठेवा, ह्यासाठी की, ज्याविषयी ते तुम्हांला दुष्कर्मी समजून तुमच्याविरुद्ध बोलतात त्याविषयी त्यांनी तुमची सत्कृत्ये पाहून ‘समाचाराच्या दिवशी’ देवाचा गौरव करावा.**

जगीक लोक आमचे निरीक्षण करीत असतानांही, त्यांनी आम्हास प्रामाणिक म्हणून ओळखले पाहिजे. सचोटी आणि प्रामाणिकपणाची ही पातळी आहे जी आम्ही राखली पाहिजे कारण जेव्हा ते आमच्याकडे पाहतात तेव्हा त्यांच्याजवळ आमच्याकडे बोट दाखविण्याचे कुठलेही कारण असता कामा नये.

# 2
# परमेश्वर आमची पडताळणी करतो आणि आमचा सात्विकपणा जाणतो (किंवा त्याची उणीव!)

परमेश्वर आमची पडताळणी करतो आणि आमची सचोटी, आमचा सात्विकपणा जाणतो. आमच्या पाळकांना कदाचित आमच्या खरेपणाची किंवा सचोटीची पातळी कधीच कळणार नाही. जरी आपण आपल्या परिचयपत्रामध्ये खोटी माहिती टाकली आणि रविवारी सकाळी चर्चमध्ये जाऊन देवाची उपासना केली तरी आपल्या पाळकांना ते कधीच कळणार नाही. पण परमेश्वर ते जाणतो. तो आमची सचोटी आणि त्याचा अभाव जाणतो. राजा दावीद म्हणतो, *"परमेश्वर लोकांचा न्याय करतो; माझ्या नीतिमत्त्वाप्रमाणे व माझ्या ठायी असलेल्या सात्त्विकतेप्रमाणे, हे परमेश्वरा, माझा न्याय कर"* (स्तोत्रसंहिता 7:8).

दावीद पवित्र शास्त्रात प्रार्थना करतो, *"हे परमेश्वरा, माझा न्याय कर, कारण मी सात्त्विकपणे वागलो आहे, आणि परमेश्वरावर भरवसा ठेवला आहे; मी घसरणार नाही. हे परमेश्वरा, मला कसास लाव, माझी पारख कर; माझे अंतर्याम व माझे हृदय पडताळून पाहा"* (स्तोत्रसंहिता 26:1,2). किती सामर्थ्यशाली प्रार्थना! दावीद खरेपणाने वागला म्हणून तो प्रार्थना करू शकला की परमेश्वराने त्याचे समर्थन करावे. बरेचदा आपण म्हणतो, "मी माझ्या अधिकाऱ्याला सांगितले की मी खोटे बोलणार नाही, तर माझी नोकरी मला गमवावी लागू शकते." तुमच्या सरळपणामुळे तुमची नोकरी गमवावी लागेल अशा स्थितीत तुम्ही असाल तर देवाची स्तुती करा, कारण मग तुम्ही दाविदाच्या

प्रार्थनेप्रमाणे प्रार्थना करू शकता आणि परमेश्वराला तुमचे समर्थन करण्यास सांगू शकता.

तथापि आपण जर सचोटीने वागलो नाही तर आपण परमेश्वरास विनंती करू शकत नाही की त्याने आपले समर्थन करावे. स्तोत्रकर्त्यासमान आपण हे म्हणावयास समर्थ असले पाहिजे की आम्ही सात्विकपणे वागलो, आणि जे योग्य होते असे आम्हाला वाटले ते आम्ही केले आणि मग परमेश्वरास विनंती करावी की त्याने आमचे युद्ध लढावे.

**यिर्मया 23:23,24**
**23 परमेश्वर म्हणतो, मी जवळचा मात्र देव आहे आणि दूरचा देव नव्हे काय?**
**24 परमेश्वर म्हणतो, माझ्या दृष्टीस पडणार नाही अशा गुप्त स्थळी कोणाला लपता येईल काय? मी आकाश व पृथ्वी व्यापून राहत नाही काय? असे परमेश्वर म्हणतो.**

परमेश्वर पवित्र शास्त्रात एक मनोरंजक प्रश्न विचारतो—*"माझ्या दृष्टीस पडणार नाही अशा गुप्त स्थळी कोणाला लपता येईल काय?"* (यिर्मया 23:24अ). आम्ही स्वतःस लपवू शकत नाही आणि आपली अप्रामाणिकपणाची कृत्ये करू शकत नाही आणि असे क्षणभरही मानू शकत नाही की परमेश्वर आम्हास पाहत नाही. अर्थात, कोणीही मनुष्य आम्हास पाहत नसेल, पण पृथ्वीवर असे कुठलेही गुप्त स्थान नाही जेथे आपण जाऊ शकतो, जेथे आम्ही परमेश्वराच्या दृष्टीस पडणार नाही. आम्ही आमच्या संगणकाच्या मागे बसून मासिक अहवालात सर्व प्रकारचे खोटे लिहित असू आणि कोणालाही काही कळणार नाही असा विचार करू शकतो. पण लक्षात ठेवा परमेश्वर पाहात आहे. तो आमच्या अंतःकरणाची सचोटी जाणतो आणि त्याचा पडताळा करतो.

**इब्री 4:13**
**आणि त्याच्या दृष्टीला अदृश्य अशी कोणतीही निर्मिती नाही, तर ज्याच्याबरोबर आपला संबंध आहे त्याच्या दृष्टीला सर्व उघडे व प्रकट केलेले आहे.**

आपण देवापासून लपवू शकतो असे काहीही नाही. आम्हाला अशा ठिकाणी येण्याची गरज आहे जेथे आम्ही पवित्र परमेश्वराचे भय धरू ज्यामुळे आम्हाला सरळपणे, सात्विकपणे आणि सचोटीने जीवन जगण्यात मदत मिळेल.

# 3
# आम्ही आमच्या सचोटीबाबत अद्याप तडजोड का करतो?

आम्ही आतापर्यंत जे काही वाचले हे सर्व आमच्यापैकी अनेकांच्या परिचयाचे आहे. बालपणापासून आम्हाला शिकवण्यात आले आहे की खोटे बोलणे चुकीचे. आम्ही प्रामाणिक असले पाहिजे, सरळ मार्गाने चालले पाहिजे. आतापर्यंत उल्लेख केलेल्या पवित्र शास्त्रातील बहुतेक वचनांशी आम्ही परिचित असू शकतो. आमच्या पवित्र शास्त्रामध्ये आम्ही ते अधोरेखित केले असेल!

पण आम्हाला स्वतःस हा प्रश्न विचारण्याची गरज आहे:

- आम्ही अद्याप खोटे का बोलतो?
- आपण बराच काळ ख्रिस्ती असूनही आपल्या कामात, सेवाकार्यात अप्रामाणिक असतो का? बऱ्याचदा, आम्ही लोकांना सांगतो की आम्ही एका विशिष्ट कारणासाठी पैसे उभे करत आहोत आणि पैसे दुसऱ्या कशासाठी तरी ते वापरतो.
- परमेश्वराचे लोक ज्यांना या सर्व गोष्टी माहीत आहेत आणि ज्यांनी या सर्व गोष्टींविषयी परमेश्वराच्या वचनात वाचले आहे ते अद्याप अप्रामाणिक का आहेत?

आपण अप्रामाणिकपणाने का वागत राहतो याची काही कारणे आहेत. ही अशी कारणे आहेत जी आपल्याला आपल्या जीवनात सचोटी, प्रामाणिकपणा आणि सरळपणा राखण्यापासून रोखतात. येथे काही संभाव्य कारणे आहेत.

## देवाचे खरे भय नाही—देवाची कृपा गृहीत धरणे

आम्ही कधीकधी परमेश्वराची क्षमा, दया, स्थिर प्रेम आणि चांगुलपणाबद्दल बोलणाऱ्या वचनांशी खूप परिचित होतो ज्यांना आपण सहज घेतो. आपल्याला असे वाटते की आपण खोटे बोलत राहिलो आणि अप्रामाणिकपणे वागलो तरीही देव आपल्याला क्षमा करेल. आपल्या जीवनात परमेश्वराची खरी भीती नाही. *"दया व सत्य ह्यांच्या योगाने पापाचे क्षालन होते, आणि परमेश्वराचे भय बाळगल्याने माणसे दुष्कर्मापासून दूर राहतात"* (नीतिसूत्रे 16:6). केवळ परमेश्वराची खरी भीती व्यक्तीला वाईटापासून दूर ठेवते. आपण त्याचे इतके भय बाळगावे आणि त्याचा इतका आदर केला पाहिजे की आम्ही पापात—अप्रामाणिकपणा, खोटे बोलणे आणि अनीतीमध्ये अडकू नये. जेव्हा परमेश्वराचे भय नसेल, तेव्हा आपल्याला जे आवडेल ते आम्ही करू. हे खरे आहे की आपण परमेश्वराच्या कृपेवर अवलंबून, पण त्याचबरोबर आपल्या हृदयात परमेश्वराचे भय असणे आवश्यक आहे.

ही दुःखाची गोष्ट आहे की काही देवाचे सेवक आणि परमेश्वराच्या उपदेशकांच्या जीवनात देवाची भीती नसते आणि जेव्हा ते व्यासपीठावर उतरतात तेव्हा ते खोटे बोलण्यास आणि सर्व प्रकारच्या चुकीच्या गोष्टी करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. जेव्हा आपण, परमेश्वराचे सेवक, परमेश्वराचे भय बाळगत नाही, तर मग आपण लोकांना देवाचे भय कसे शिकविणार? आम्हाला अशा ठिकाणी येण्याची **गरज** आहे जेथे आम्ही परमेश्वराचे भय बाळगावे.

## मनुष्याचे भय

कधीकधी आपण लोकांच्या भीतीमुळे खोटे बोलतो—जर आपण त्यांना सत्य सांगितले तर ते कशी प्रतिक्रिया व्यक्त करतील याविषयीचे भय आम्हास असते. आम्हास मनुष्याच्या भीतीवर मात करायला हवी! आम्ही इतके धाडसी असले पाहिजे की आम्हाला खरे बोलता यावे

आणि नीतिमत्वाने चालता यावे, मग आम्ही कोणाशीही व्यवहार का करीत असेना !

## परिणामांचे भय

“जर का मी खोटे बोलून या परिस्थितीतून बाहेर पडलो नाही तर मी त्यात अडकून पडेन, म्हणून खोटे बोलूनच बाहेर पडणे बरे” खोटे बोलण्यासाठी लोकांजवळ ही दुसरी सबब असते. परिणाम काहीही का असेना, सत्याने चालण्याइतके आम्ही धैर्यवान असले पाहिजे. लक्षात ठेवा जेव्हा आम्ही प्रामाणिकपणे चालतो तेव्हा परमेश्वर आमच्या पक्षास असतो!

## प्रतिष्ठा / अहंकार

कधी कधी आमचे खोटे बोलण्याचे कारण म्हणजे आम्ही स्वतःची प्रतिष्ठा आणि अभिमान वाचवू इच्छितो. उदाहरणार्थ, जेव्हा कोणी आम्हास विचारते की आम्ही आपली परीक्षा उत्तीर्ण केली आहे का तेव्हा आम्ही फक्त म्हणतो, “होय,” पण हे खरे नसते.

## विश्वासाऐवजी सोयीनुसार जगणे

विश्वासाऐवजी सोयीने जगण्याकडे आमचा कल असतो कारण विश्वासाने जगण्यासाठी फार प्रयत्न करावा लागतो. जेव्हा आपल्याला खात्री असते की आपण नेहमी सत्य बोलले पाहिजे, तेव्हा कितीही किंमत मोजावी लागली तरी आपण सत्य बोलले पाहिजे. सोय म्हणते, “ते सोपे असेल तर मी सत्य बोलेन जर ते कठीण असेल, तर मी खोटे बोलून त्यातून बाहेर पडणार.” कृपा करून स्वतःला सांगा की आपण विश्वासाने **जगणार!** आम्ही विश्वासाने जगले पाहिजे आणि सोयीने. आपल्याला खात्री पटली पाहिजे की आपण विश्वासू , सत्य आणि प्रामाणिकपणाने वागणारे स्त्री-पुरुष असायला हवे.

## नाराज करण्याची / दुखापत करण्याची भीती

कधी कधी लोक खोटे बोलतात कारण ते ज्या व्यक्तीशी बोलत असतात त्यांना दुखावू इच्छित नाहीत. खोटेपणा हा शेवटी खोटेपणा आहे, मग आपला हेतू चांगला का असेना!

## लपविण्याद्वारे चांगले बनण्याचा प्रयत्न करणे

कधी कधी लोक जेव्हा आपल्या मित्रासाठी एखादी गोष्ट लपविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते खोटे बोलतात. तुम्ही कितीही प्रामाणिक असलात तरीही खोटे हे खोटे असते! हे लक्षात ठेवा. सत्य एकट्याने उभे राहू शकते. लबाडी करून किंवा खोटे बोलून सत्याचा बचाव करण्याची गरज नाही.

# 4
# अप्रामाणिकपणाचे परिणाम

आपण सचोटीच्या बाबतीत तडजोड करतो याचे दुसरे कारण हे आहे की खरे म्हणजे आम्हाला त्याच्या परिणामांचा गंभीरपणा समजत नसतो. अनेकदा, आम्हाला वाटते की जर आम्ही परमेश्वराकडे जाऊन आम्हास क्षमा करण्याची विनंती केली तर  सर्व काही ठीक होईल. अर्थात परमेश्वर आम्हाला क्षमा, पण तरीही आपणास परिणाम भोगावेच लागतात. परमेश्वर सर्व परिणाम बदलणार नाहीत. आम्ही जे काही पेरले आहे त्याचे परिणाम आम्हाला भोगावे लागतील. आम्हाला अप्रामाणिकपणाचे परिणाम पूर्णपणे समजून घेण्याची गरज आहे.

आपण काही शास्त्रवचने पाहू या.

**नीतिसूत्रे 19:5**
**खोटी साक्ष देणाऱ्याला शिक्षा चुकणार नाही; लबाड बोलणारा सुटणार नाही.**

अनेक वेळा आपण सुटण्यासाठी खोटे बोलतो. परंतु आपल्याला हे समजत नाही की परमेश्वराचे वचन सांगते, *"... लबाड बोलणारा सुटणार नाही"* (नीतिसूत्रे 19:5आ). खोटे बोलून एका विशिष्ट परिस्थितीतून बाहेर पडल्याबद्दल आम्हाला आनंद होत असेल, पण आम्हांला या गोष्टींची जाणीव नसते की जर आम्ही पश्चातापपूर्वक त्या गोष्टी हाताळल्या नाहीत तर आम्ही त्याच्या तावडीत सापडू.

- आपण स्वतःला मोठ्या सापळ्यात अडकवत आहोत हे लक्षात न येता कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी आपण अनेकदा खोटे बोलतो!

**नीतिसूत्रे 20:17**
**लबाडीची भाकर मनुष्याला गोड लागते, पण मग त्याच्या तोंडात माती पडते.**

लबाडीने कमावलेली भाकर प्रारंभी गोड वाटत असेल, पण जर ती लबाडीने कमावलेली असेल तर पवित्र शास्त्र म्हणते की *"तोंडात माती पडेल"* (नीतिसूत्रे 20:17आ). लबाडी किंवा खोटेपणा म्हणजे जेव्हा एखादी व्यक्ती आपल्या परिचयपत्रामध्ये लिहिते की त्याच्याजवळ सहा वर्षांचा अनुभव आहे, पण खरे म्हणजे त्याच्याजवळ फक्त सहा महिन्यांचा अनुभव आहे! अप्रामाणिक मार्गाने कमावलेला पैसा जरी प्रारंभी गोड वाटत असला तरी नंतर तो तोंडात मातीसारखा ठरेल. नीतिसूत्रे 21: 6 सुद्धा हेच सत्य कळविते, *"असत्य जीभेने मिळविलेले धन इकडेतिकडे उडून जाणाऱ्या वाफेसारखे आहे, मृत्यूच्या मागे लागणारे त्याला बोलावतात."* अप्रामाणिकपणाने आपल्याला मिळालेली संपत्ती आपल्याला मृत्यू आणि विनाशाकडे घेऊन जाते आणि ती संपत्ती लवकरच नाहीशी होते.

- अप्रामाणिकपणा "त्वरित आणि सोपा" मार्ग वाटत असेल पण त्याचे परिणाम लवकरच आम्हाला कचाट्यात पकडतील!

**नीतिसूत्रे 29:12**
**अधिपती खोट्या गोष्टीला कान देणारा असला, तर त्याचे सर्व सेवक दुष्ट बनतात.**

- जेव्हा नेतृत्व पदावरील व्यक्ती अप्रामाणिक असते तेव्हा त्याच्या खाली असणारे सर्व लोक याच मार्गाने त्याचे अनुसरण करतात!

**होशे 10:12,13**
**12 तुम्ही आपणांसाठी नीतिमत्त्वाची पेरणी करा म्हणजे प्रेमाची कापणी कराल; पडीत जमीन नांगरून काढा; कारण परमेश्वराने येऊन तुमच्यावर नीतिमत्त्वाची वृष्टी करावी ह्याकरता त्याला शरण जाण्याचा हा समय आहे.**
**13 तुम्ही दुष्टतेच्या पेरणीसाठी नांगरले, अधर्माची कापणी केली, तुम्ही लबाडीचे फळ खाल्ले. कारण तू आपल्या मार्गांवर भिस्त ठेवली, आपल्या पराक्रमी वीरसमूहावर भाव ठेवला.**

होशे 10:12,13 एक अत्यंत मनोरंजक सत्य कळविते. प्रत्येक वेळी आपण खोटे बोलतो तेव्हा आपण अनीती, दुष्टपणा पेरतो आणि उशिरा का होईना आपण आपल्या खोटेपणाचे फळ खात असतो. खोटेपणा त्याचे फळ देईल आणि ते आपण खाऊ. म्हणून आम्ही हे समजले पाहिजे की आमच्या लबाडीचे आणि अप्रामाणिकपणाचे हे परिणाम आहेत.

- आपण पेरलेल्या प्रत्येक खोट्यासाठी आपल्याला एक *"लबाडीचे फळ"* (होश 10:13) मिळेल!

**योहान 8:44**
**तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे.**

- जेव्हा आपण खोटे बोलतो तेव्हा आपण सैतानाच्या कार्यात भागीदार होतो!

पवित्र शास्त्र बायबल म्हणते की खोटे बोलणाऱ्यास, लबाडी करणाऱ्यास अग्नीच्या सरोवरात टाकले जाईल—सर्वात गंभीर परिणाम.

**प्रकटीकरण 21:8**
**परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे, अमंगळ, 'खून करणारे,' जारकर्मी, चेटकी, मूर्तिपूजक, व सर्व लबाड माणसे ह्यांच्या वाट्यास 'अग्नीचे व गंधकाचे' सरोवर येईल; हेच ते दुसरे मरण आहे."**

पवित्र शास्त्र सांगते की विश्वासाच्याद्वारे कृपेने आमचे तारण झाले आहे (इफिसकरांस पत्र 2:8). प्रभू येशू ख्रिस्ताच्या ज्ञानप्रत येणारा प्रत्येक व्यक्ती तारण प्राप्त करील आणि येशू ख्रिस्तामध्ये कृपा, दया, क्षमा, आणि तारण आहे. तथापि, परमेश्वराने विशिष्टरित्या एका गंभीर परिणामाचा उल्लेख केला आहे—की जर आम्ही खोटारडे आहोत तर आम्हाला नरकात पाठविले जाईल (प्रगटीकरण 21:8).

सैतान हा लबाडीचा पिता आहे आणि त्याच्या ठायी मुळीच सत्य नाही (योहान 8:44) म्हणून परमेश्वर खोटे बोलणाऱ्यांस म्हणेल, "जर तुम्हाला खोटेपणाने जगायचे असेल तर आपल्या पित्याबरोबर राहा!" लबाडीचा आणि सत्य न बोलण्याचा असा गंभीर परिणाम! आपण हे समजून घेतले पाहिजे की अप्रामाणिकपणाचे त्याचे परिणाम आहेत—या सध्याच्या जगात आणि भविष्यातही. "हे ऐकून आमच्यात पवित्र भय उत्पन्न व्हावे, जेणेकरून आम्ही, परमेश्वरा, मला दुष्टपणाची पेरणी करावयाची नाही, मला माझ्या खोटेपणाची फळे खावयाची नाहीत. मला अनीती आणि दुष्टपणाची फळे कापावयाची नाहीत."

- अंतिम परिणाम—खोटे बोलणारे नरकात जातात!

# 5
# प्रामाणिकपणाचे आशीर्वाद

जे प्रामाणिकपणे, नीतिमत्ता आणि सचोटीने वागतात त्यांच्यासाठी अद्‌भुत आशीर्वाद ठेवलेले आहेत.

## आशीर्वाद आणि कृपा

**स्तोत्रसंहिता 5:12**
**कारण तूच नीतिमानाला आशीर्वाद देतोस; हे परमेश्वरा, तू त्याच्याभोवती कवचाप्रमाणे कृपेचे वेष्टन घालतोस.**

कल्पना करा की आपण मुलाखतीसाठी जात आहात आणि परमेश्वराची कृपा प्राप्त व्हावी म्हणून प्रार्थना करीत आहा. पवित्र शास्त्र म्हणते की परमेश्वर नीतिमानांवर कृपा करील. जर आपण आपल्या परिचयपत्रामध्ये अप्रामाणिकपणा केला असेल तर आपण परमेश्वराच्या कृपेविषयी विसरून जावे कारण तो म्हणतो की तो नीतिमानास आशीर्वाद देईल आणि नीतिमानावर कृपा करील—अनैतिक आणि अप्रामाणिक व्यक्तीवर नव्हे तर सरळ, नीतिमान व्यक्तीवर. तर मग आपण काय करावे? आपल्या परिचयपत्रामध्ये सहा वर्षे असे खोटे लिहिण्याऐवजी आपण सत्य सांगावे की आपल्याला "सहा महिन्यांचा" अनुभव आहे आणि मग धैर्याने परमेश्वरास सांगावे की त्याने सहा वर्षांचा अनुभव असलेल्या व्यक्तीला मिळावी ती नोकरी तुम्हाला द्यावी म्हणून आपण त्याच्यावर  अवलंबून आहात. आपल्या परिचयपत्रामध्ये खोटी माहिती लिहिण्याऐवजी असे करणे योग्य ठरेल. परमेश्वर जेथे नीतिमत्व आहे तेथेच आपली कृपा प्रगट करतो.

## संरक्षण आणि उत्तरित प्रार्थना

स्तोत्रकर्ता म्हणतो, *"सात्त्विकपण व सरळपण माझे संरक्षण करोत, कारण मी तुझी प्रतीक्षा करीत आहे"* (स्तोत्रसंहिता 25:21). हे किती सुरक्षित स्थान आहे, परमेश्वरास हे सांगावयास समर्थ असणे की आम्ही सचोटीने आणि प्रामाणिकपणे चाललो आहोत आणि आम्ही जाणतो की आम्हाला संरक्षण प्राप्त होईल!

**स्तोत्रसंहिता 34:15**
**परमेश्वराचे नेत्र नीतिमानांकडे असतात; त्याचे कान त्यांच्या हाकेकडे असतात.**

**स्तोत्रसंहिता 34:17**
**नीतिमान धावा करतात, तो ऐकून परमेश्वर त्यांना त्यांच्या सर्व संकटांतून मुक्त करतो.**

**स्तोत्रसंहिता 34:19**
**नीतिमानाला फार कष्ट होतात, तरी परमेश्वर त्या सर्वांतून त्याला सोडवतो.**

उत्तरित प्रार्थना आणि संरक्षण नीतिमानांसाठी आहेत. जेव्हा आपण यासाठी ठाम उभे राहतो तेव्हा आपल्याला खूप त्रास सहन करावा लागतो, परंतु देव आपल्याला त्या प्रत्येकापासून वाचवेल.

## कायमचे संरक्षण

**नीतिसूत्रें 12:19**
**सत्याची वाणी सर्वकाळ टिकेल; असत्य बोलणारी जिव्हा केवळ क्षणिक आहे.**

सत्य कायम राहते! आज खोटेपणामुळे आपले काम साधत असेल, पण नंतर त्याचा काहीच फायदा होणार नाही. आपण त्यावर अवलंबून राहू शकत नाही. पहिले खोटे लपविण्यासाठी आम्हाला आणखी खोटेपणा करावा लागेल. खोटेपणात सुरक्षितता नसते. तथापि जेव्हा आम्ही सत्य बोलतो तेव्हा आम्हास सुरक्षित वाटते आणि आम्ही सुरक्षित **असतो**. आम्हाला स्वतःचा बचाव करण्याची गरज नाही

कारण सत्य स्वतःचा बचाव करते!

## स्पष्टता / प्रकाश

**स्तोत्रसंहिता 97:11**
**नीतिमानांसाठी प्रकाश व जे सरळ अंतःकरणाचे आहेत त्यांच्यासाठी हर्ष पेरला आहे.**

जेव्हा आम्ही नीतिमत्वाने चालतो तेव्हा आपण अपेक्षा करू शकतो की परमेश्वराचा प्रकाश आमच्या मार्गावर पडेल. जेव्हा आम्ही नीतिमत्वामध्ये चालत नाही तेव्हा आम्ही तक्रार करू शकत नाही की मार्ग अंधकारमय आहे आणि भविष्य उदासवाणे आहे. याचा अशाप्रकारे विचार करा—जितक्यांदा आपण खोटे बोलतो तितक्यांदा आपण आमच्या जीवनातील परमेश्वराचा प्रकाश “विझवितो” आणि तसेच जितक्यांदा आपण नैतिकतेमध्ये चालतो तितक्यांदा आपण तो “प्रकाश सुरू” करीत असतो, यासाठी की आपणास मार्ग स्पष्टपणे दिसून यावा!

## वारसा

**नीतिसूत्रें 20:7**
**जो नीतिमान मनुष्य सात्त्विकपणे चालतो, त्याच्यामागे त्याची मुले धन्य होतात.**

जेव्हा आपण प्रामाणिकपणात, सचोटीने चालतो, तेव्हा आपण आपल्या मुलांसाठी मागे आशीर्वाद सोडून जातो. या उलट, जेव्हा आपण सचोटीने वागत नाही, तेव्हा आपण आपल्या मुलांसाठी शाप सोडून जातो. जो वारसा आपण आपल्या मुलांसाठी सोडून जातो तो आपण सचोटीने चालतो की नाही यावरून ठरवला  जातो.

# 6
# प्रतिसाद—सुटका, पश्चाताप, परित्याग आणि समर्पण

## लबाडीच्या आत्म्याची बंधने तोडणे

आम्हाला सत्य माहित असलेल्या जागेवरून पुढे जाऊन ते कृतीद्वारे आपल्या जीवनात लागू करावे. आपल्यापैकी काही जण अशा परिस्थितीत असतील जेथे खोटे बोलणे किंवा लबाडी करणे हा दुसरा स्वभाव असेल आणि आपण ते का करतो हे आपणास ठाऊक नाही. पवित्र शास्त्र कमीत कमी दोन ठिकाणी लबाडीच्या आत्म्यांच्या उल्लेख करते (1 राजे 22:22,23; 2 इतिहास 18:21,22). याचा अर्थ हा की काही दुरात्मे आहेत जे खोटेपणास अथवा लबाडीस वाढीस लावतात आणि लोकांच्या चारित्र्यावर आणि आचरणावर प्रभाव टाकतात. हे शक्य आहे की आपण नवीन जन्म प्राप्त झालेले, आत्म्याने परिपूर्ण, आणि अन्य  भाषा बोलणारे असाल पण आपण खोटे बोलणाऱ्या, लबाडीच्या आत्म्याच्या नियंत्रणात असू शकतो. परमेश्वराचा धावा करा आणि या बंधनातून मुक्त व्हा!

## खोटेपणाप्रत आपली प्रवृत्ती बदला

**नीतिसूत्रें 13:5**
**नीतिमानाला असत्याचा तिटकारा असतो, परंतु दुर्जन अप्रतिष्ठा व निंदा ह्यांना कारण होतो.**

**स्तोत्रसंहिता 119:163**
**मी असत्याचा द्वेष करतो व त्याचा वीट मानतो; परंतु तुझे नियमशास्त्र मला प्रिय आहे.**

जरी आमच्यापैकी बहुतांस हे माहीत आहे की परमेश्वरास अप्रामाणिकपणा मान्य नाही, तरी आम्हाला तो सहन करावा लागतो, इतरांमध्ये आणि स्वतःमध्येही. आम्हाला खोटेपणा सहन करण्यापासून पुढे जाऊन कोणत्याही अप्रामाणिकपणे वागण्याबाबतीत पवित्रतेद्वारे असहिष्णु व्हावे लागेल. आम्हास लोकांप्रत असहिष्णु राहावयाचे नाही, तर आम्ही खोटेपणा आणि अप्रामाणिकपणाच्या सवयीप्रत असहिष्णु आहोत. आम्ही लबाडीचा, खोटेपणाचा, तिरस्कार केला पाहिजे. पवित्र शास्त्र सांगते, *"नीतिमानाला असत्याचा तिटकारा असतो"* (नीतिसूत्रें 13:5अ). आम्हाला लबाडीप्रत आपली प्रवृत्ती बदलण्याची गरज आहे. खोटेपणास आमच्या जीवनातून दूर करण्यासाठी आपण परमेश्वराच्या कृपेसाठी त्याचा धावा करू या. मन दुखावले तरी सत्य बोलण्याचा निश्चय करू या.

## अप्रामाणिकतेशी भागीदारी करण्यास नाकार देणे

**स्तोत्रसंहिता 101:7**
**कपट करणाऱ्याला माझ्या घरात थारा मिळणार नाही; असत्य बोलणारा माझ्या दृष्टीपुढे टिकणार नाही.**

इतर लोकांच्या अप्रामाणिकपणात भागीदार होऊ नका. जेव्हा आम्ही लोकांसोबत विविध प्रकारच्या भागीदारीमध्ये काम करत असतो—मग ते कामाच्या ठिकाणी असो किंवा इतरत्र काम करत असतो तेव्हा हे खरे आहे. कधी कधी जेव्हा आपण इतर लोकांना खोटे बोलतांना पाहतो, तेव्हा आपण खरे बोलण्याऐवजी किंवा त्या लबाडीत भाग घेण्यास नाकार देण्याऐवजी त्यात सहभागी होतो. आपण असे मानतो की हा तो त्या व्यक्तीचा खोटेपणा आहे आणि ते मी म्हटलेले नाही म्हणून आपण त्यापासून मुक्त आहोत. पण तथ्य हे आहे की त्याचे सोबती म्हणून आपण सुद्धा त्या लबाडीत  भागीदार ठरतो.

मला आठवते एक तरुण मुलगा आमच्या सर्व सभांत, प्रार्थना

सभांत, आणि कार्यक्रमांत पूर्ण एक वर्षभर येत राहिला, हे आमच्या चर्चच्या सुरवातीच्या वर्षाची गोष्ट आहे. मी खरोखर प्रभावित होतो, पण मी त्याला तसे बोललो नाही. एका रविवारच्या सकाळी, मी "समर्पणाचे सामर्थ्य" या विषयावर बोललो आणि इतर गोष्टींसोबतच खरेपणाप्रत वचनबद्ध राहण्याविषयी बोललो. उपासनेच्या  शेवटी, हा माणूस मजजवळ आला आणि त्याने मला सांगितले की त्याने विदेशातील एका बायबल कॉलेजमध्ये अर्ज पाठविला आहेआणि व्हिसा आणि इतर गरजांसाठी, मी गेल्या एक वर्षापासून ऑल पीपल्स मंडळींमध्ये काम करत असल्याचे पत्र लिहावे अशी त्याची इच्छा होती. मंडळी त्याला बायबल कॉलेजमध्ये शिकण्यासाठी पाठवत आहे आणि अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तो परत येईल आणि चर्चसोबत काम करेल असे मी सांगावे अशी त्याची इच्छा होती. तथापि, हा तरुण जे काही मला लिहावयास सांगत होता त्यातले काहीही खरे नव्हते. मला धक्काच बसला! मी त्याला दुसऱ्या दिवशी भेटावयास सांगितले. जेव्हा आम्ही भेटलो, तेव्हा मी त्याला दाखवून दिले की अशी विनंती करणे सुद्धा चुकीचे आहे. मी त्याला सांगितले की मी त्याला फक्त हे पत्र लिहून देईन की त्याने नियमितपणे या काळात मंडळीत भाग घेतला होता, आणि मी ते पत्र त्याच्या हाती दिले.

मी अगदी हेच कळविण्याचा प्रयत्न करीत आहे. आपण नियमितपणे चर्चला जात असाल, अनेक संदेश ऐकत असाल, पण तरीही आम्ही लबाडी करतो आणि अशाप्रकारच्या असत्य गोष्टींचा आधार घेतो. जेव्हा अशा लोकांशी आमची भेट घडून येते, तेव्हा आम्हाला आश्चर्य वाटते की ते कोणत्या मंडळीचे सदस्य आहेत आणि त्यांना सचोटी राखण्याच्या गरजेविषयी सांगण्यात आलेले आहे किंवा नाही. मला ख्रिस्ती भावाबहिणींच्या अशा अनेक घटना आठवतात जे अप्रामाणिकपणा आणि अनैतिकता यांत वावरत आहेत. पण **आता** ते सर्व बदलले पाहिजे.

आम्हाला अप्रामाणिकपणा सहन करण्यापासून निघून अशा ठिकाणी आले पाहिजे जेथे आम्हाला अप्रामाणिकपणाच्या सर्व स्वरूपांचा तिटकारा आणि तिरस्कार वाटतो.

## समर्पणाची प्रार्थना

आपण समर्पणाची प्रार्थना करू या. स्तोत्रकर्त्याने अशाप्रकारे प्रार्थना केली, *"हे परमेश्वरा, माझ्या मुखावर पहारा ठेव; माझ्या वाणीचे द्वार सांभाळ"* (स्तोत्रसंहिता 141:3) आणि *"असत्याचा मार्ग माझ्यापासून दूर कर; करुणा करून तुझे नियमशास्त्र मला दे"* (स्तोत्रसंहिता 119:29).

आपण परमेश्वरासमोर सचोटी, प्रामाणिकपणा आणि नीतीमत्वाच्या स्थानी येऊ या. आपणास माहीत आहे की परमेश्वर करुणा, प्रेम आणि दयायुक्त परमेश्वर आहे. तथापि, आपण त्यास गृहीत धरू नये. आपण परमेश्वराच्या कृपेचा दुरुपयोग करता कामा नये. आम्हाला या क्षेत्रात परमेश्वराच्या स्पर्शाची गरज आहे कारण आपण सर्वजण कमी-अधिक प्रमाणात अप्रामाणिक आहोत.

## प्रार्थना

*परमेश्वरा, माझ्याकडून खोटेपणाचा मार्ग दूर कर. माझ्याकडून अप्रामाणिकपणा आणि सचोटीचा अभाव दूर कर. अप्रामाणिकपणाची माझी सहनशीलता दूर कर आणि मला अप्रामाणिकपणाचा तिटकारा यावा असे कर. माझ्या आयुष्यात "शस्त्रक्रिया" कर, प्रभु! तुझ्या आत्म्याच्या तलवारीने खोल खणून घे आणि ते मुळांसकट उपटून टाक. मी माझ्या आयुष्यात इतका काळ अप्रामाणिकपणा सहन केला आहे, परंतु आता मी तुझ्याकडे येतो आणि तुला त्याचा शेवट करण्यास सांगतो. कुऱ्हाड मुळांना लाव आणि मुळांसकट उपटून टाक. माझ्यातील*

*खोटे बोलणे, अप्रामाणिकपणा आणि अधर्म दूर कर. मला एक अशी व्यक्ती व्हायचे आहे जी तुझ्यापुढे सचोटीने चालेल आणि तुझ्याकडे समर्थनासाठी, कृपेसाठी, आशीर्वादासाठी पाहील. मला एक अशी व्यक्ती बनण्याची इच्छा आहे जी सत्यतेने वागेल आणि तुम्हाला आनंद देईल. मी लोकांना अस्वस्थ केले तरी काही फरक पडत नाही. मी तुला आनंदित करू इच्छितो. माझ्या देवा, मला तुला आनंद द्यायचा आहे. तू माझ्याबद्दल आनंदी आणि उत्साहित व्हावे अशी माझी इच्छा आहे. प्रभु, केवळ पवित्र आत्म्याचे शुद्धीकरणाचे कार्य आणि सामर्थ्य माझ्या आत्म्याच्या खोलीपर्यंत जाऊ शकते आणि माझ्या आयुष्यातील या दोषाची मुळे कापू शकते. मी फक्त तुझ्या सिंहासनासमोर स्वतःला ठेवतो; माझ्यामध्ये काम करण्यासाठी हा वेळ घे. आपल्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने ते कर. येशूच्या नावाने मी प्रार्थना करतो. आमेन.*

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"*** **(रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखववावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"*** **(प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"*** **(रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

**किशोरवयीन मुलांसाठी**

**वैयक्तिक सल्ला**

**नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने**

**शिक्षेतील उणीव**

**कामाशी संबंधित समस्या**

**कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक**

**पालक/मुले/भावंडे/समवयस्क**

**वर्तणूक विकार**

**व्यक्तिमत्व विकार**

**मानसिक भावनिक /**
**अडचणी**

**तणाव/आघात**

**मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन**

**आध्यात्मिक समस्या**

**लाईफ कोचिंग**

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च," बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout, Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*

"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌त कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9:00 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

आज जगातील प्रत्येक ठिकाणी, भ्रष्टाचार, अप्रामाणिकपणा आणि लाच या सर्वसामान्य गोष्टी ठरल्या आहेत. जग असेच चालत असल्यासारखे वाटते कारण त्यांना तसेच शिकविण्यात आले आहे, यापेक्षा चांगले ते त्यांना ठाऊक नाही. तथापि, दुःख खरोखर या गोष्टीचे वाटते की आपण परमेश्वराच्या लोकांमध्येही—आमच्यामध्ये—अप्रामाणिकपणा, अनैतिकता आणि सचोटीचा अभाव पाहतो, कारण कसे वागावे ते आम्हाला समजावयास हवे.

सचोटी, प्रामाणिकपणा, शुद्धता आणि नीतिमत्वात कसे चालावे हे आम्ही जाणले पाहिजे कारण आम्ही हे सर्वकाही परमेश्वराच्या वचनात वाचतो. याहीपेक्षा वाईट म्हणजे आम्ही पाळक उपदेशक शिक्षक आणि देवाच्या वचनाच्या सेवकांमध्ये अनैतिकता, अप्रामाणिकपणा आणि सचोटीचा अभाव पाहतो. आमच्यापैकी प्रत्येकाने जे काही आम्ही करतो त्या प्रत्येक बाबतीत सचोटी, प्रामाणिकपणा आणि सरळपणाप्रत वचनबद्ध असले पाहिजे, आणि हे पुस्तक आमच्यामध्ये या गुणांस प्रोत्साहन देईल.




All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org